World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2017;3(11):405-407
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ख्रिस्ती धर्मापुढील आव्हाने''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
What is true Christianity? This is my last element, but before that, what are the modern challenges facing Christianity right now? And what are its scriptural remedies? It is important to understand this. There are many attacks on Christianity all over the world. Sometimes on the church and sometimes on the followers of the church or Christian missionaries. It is therefore important to understand how prepared Christianity is for this challenge. This challenge is largely external. The same is true of the interior form.

Christianity will have to face internal challenges as well as external challenges, and they can be overcome only when false doctrines are eradicated from Christianity and this is possible. Scripture and the guidance of the Holy Spirit are enough for him. But as a Christian, am I ready to accept this challenge?

**Keywords:** Christianity, Christ, Christians, Christian, Jesus Christ, Scripture, Sects, Scriptures, Teachings, Religion

**प्रस्तावना:**

खरा ख्रिस्ती धर्म काय आहे ? हा माझा शेवटचा घटक आहे पण त्या अगोदर सध्या ख्रिस्ती धर्मापुढील आधुनिक आव्हाने काय आहेत ? आणि त्याचे पवित्रशास्त्रीय उपाय काय आहेत ? हे समजून घेणे अगत्याचे आहे. संपूर्ण विश्वात ख्रिस्ती धर्मावर अनेक प्रकारे हल्ले होत आहेत. कधी चर्चवर तर कधी चर्चच्या अनुयायी अथवा ख्रिस्ती मिशनरीवर. त्यामुळे या आव्हाणासाठी ख्रिस्ती धर्म कितपत तयार आहे, हे समजून घेणे अगत्यपूर्ण आहे. हे आव्हान जेवढ्या मोठ्या प्रमाणात बाह्य स्वरूपाचे आहे. तेवढेच आंतरिक स्वरूपाचे देखील आहे.

ख्रिस्ती धर्मात बाह्य आव्हाने म्हणजे चर्चवर होणारे हल्ले, ख्रिस्ती मिशनरीवर होणारे हल्ले, धर्मांतराचे आरोप इत्यादी येत असतात. ख्रिस्ती धर्मापुढील आव्हाने ही गेल्या दोन हजार वीस वर्षापासून सुरू आहे. येशू ख्रिस्ताला देखील रोमी सत्ता आणि यहुदी धर्मगुरूंनी कटकारस्थानाने रचून क्रुसावर खिळण्यात यश संपादन केले. येशू ख्रिस्ताचे शिक्षण हे तत्कालीन धर्म आणि राजकारण यांच्या आर्थिक पिळवणुकीला आव्हान देणारे होते. समाजातील दलित आणि पीडित लोकांना जागृत करणारे होते. त्यामुळे या घटकांना भीती वाटणे सहाजिकच होते. पुढे येशू ख्रिस्ताच्या अनुयायांवर भयंकर छळ करण्यात आला. स्टीफन्स हा ख्रिस्ती धर्मातील पहिला हुतात्मा झाला आणि संपूर्ण ख्रिस्ताचे अनुयायी येरुसलेमातून विखुरले आणि त्यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन ख्रिस्ताचा संदेश पोहोचविला. प्रेषित योहान सोडला तर बाकी अकरा प्रेषितांना वेगवेगळ्या प्रकारे छळ करून त्यांना ठार मारण्यात आले. पेत्राला क्रुसावर उलटे टांगण्यात आले. पण या घटनेमुळे ख्रिस्ती धर्माची मुळे ही संपूर्ण विश्वात वाढतच गेली. ती कधीही खुंटली नाही. विल्यम मॅकडोनाल्ड म्हणतात, "सैतान मंडळींवर जोरदार हल्ले करीत होता. आता खुद्द हेरोद राजानेच छळ सुरू केला. तोदेखील अग्रीफा एक म्हणजे थोर हेरोद राजाचा नातू होता. रोमचा सम्राट क्लोथ याने या हेरोदाची यहुद्यांचा राजा म्हणून नेमणूक केली होती. मोशेचे नियमशास्त्र वाचले पाहिले होते. म्हणून तो यहुद्याना खुश करू पाहत होता. त्यामुळे त्याने मंडळीतील काही लोकांना छळण्यास सुरुवात केली. योहानाचा भाऊ याकोब याला त्याने तलवारीने ठार केले."[१] पहिल्या शतकापासून तर आतापर्यंत ख्रिस्ती लोकांवर कोणत्या ना कोणत्या कारणावरून छळले जात आहे. तरी ते ख्रिस्ताच्या प्रभुत्वावर टिकून आहे. देवाची कृपा आणि त्यांच्यावर असलेली

अथांग श्रद्धा यामुळे काही ख्रिस्ती लोकांनी स्वतः आपले बलिदान दिले. "छळ करून ख्रिस्ताच्या चर्चला नष्ट करण्याचे सैतानाचे सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. जेव्हा येशूच्या शिष्यांनी त्यांचे प्राण गमावले. तेव्हा ख्रिस्त झेंडा उंच धरून राहणारे हे विश्वासू भक्त मृत्यूपुढे आडवे आले. तेव्हा तो थोर संघर्ष संपला नाही. खरेतर पराजयाने ते विजयी झाले. देवाचे कार्यकर्ते ठार केले गेले. परंतु त्यांचे कार्य खंड न पडता पुढेपुढेच गेले. शुभवर्तमानाचा प्रसार होतच राहिला व ते ग्रहण करणाऱ्यांची संख्या वाढतच गेली. जेथे छळ अधिक जोराने जारी करावा, असे म्हणणाऱ्या विधर्मी अधिपतीचा निषेध करताना एक ख्रिस्ती भक्त म्हणाला, 'तुम्ही आम्हाला ठार करू शकता. आमचा छळ करू शकता. आम्हाला दोषी ठरवू शकता. तुमचा अन्याय साक्ष देतो की, आम्ही निर्दोष आहोत आणि तुमच्या क्रौर्याचा तुम्हालाही काहीच फायदा होत नाही. उलट त्यामुळे ख्रिस्ती धर्माश्रद्धा स्वीकारण्यास दुसऱ्यांना जोरदार आव्हान मिळत आहे. जितक्यांदा तुम्ही आम्हाला कापून काढता, नेमक्या अधिक प्रमाणात आमची संख्या वाढते. ख्रिस्ती भक्तांचे रक्त वीज आहे."[२] ख्रिस्ती लोकांवरील छळवाद हा आजही सुरूच आहे. धर्मांतराच्या नावावर ग्रहम स्टेन्स आणि त्याच्या दोन मुलांना जिवंत जाळण्यात आले. पण त्या ख्रिस्ती मिशनरीच्या पत्नीनेने ग्रहम स्टेन्स यांना श्रद्धांजली वाहत असताना म्हटले, ''येशु आहे म्हणून आम्ही भारतात व जगात सेवा करत राहू, कारण तो जिवंत आहे. मी उद्याला सामोरे जाऊ शकते. कारण तो जिवंत आहे. सर्व भय लोप पावले आहे. कारण मला ठाऊक आहे. होय मला ठाऊक आहे. त्यांच्या हातात माझे भविष्य आहे आणि हे जीवन जगण्यायोग्य आहे, कारण तो जिवंत आहे."[३] मारेकऱ्यांना पत्नी ग्रहम स्टेन्स यांच्या पत्नीने क्षमा प्रधान केली आणि ख्रिस्ताचे शब्द पाळले. ख्रिस्ती लोकांचे जीवन छळले जात असले तरी ख्रिस्तात असते. विशाल मंगळवाडी म्हणतात, "मिशनच्या सेवाकार्याचा प्रमुख हेतू भारताच्या जीवनाच्या आजाराला बरे करण्यासाठी संघर्ष करणे हा आहे. ह्या आजाराने आपल्या शेकडो दशलक्ष लोकांची अध्यात्मिक, सामाजिक, बौद्धिक आणि शारीरिक वाढ खुंटलेली आहे. भारताने एखाद्या मदर तेरेसाचा अथवा एखाद्या ग्रहम स्टेन्सच्या ते आपल्या आजारी शरीरांना बरे करतात. म्हणून त्यांचा सन्मान करावयाचा आणि जेव्हा ते भारताच्या जीवात्म्याला बरे करण्यासाठी स्वतःला देऊ करतात, तेव्हा त्यांचा द्वेष करावा, हे असे का बरे?"[४] प्रश्न गंभीर आहे. पण धर्मांतराच्या नावाखाली ख्रिस्ती मिशनरीची कार्य झाकले जाऊ शकत नाही. कारण त्यांचे कार्य समाजहितासाठीच असते. याची हजारो लाखो उदाहरणे पाहिलेली आहे, अनुभवलेली आहे.

बाह्य आव्हानांप्रमानेच ख्रिस्ती धर्मात काही आंतरिक आव्हाने देखील आहेत. पंथांमध्ये विखुरलेल्या ख्रिस्ती धर्मात काही अंश सैद्धांतिक आणि अध्यात्मिक भेद देखील आढळून येतो. हा भेद सामान्य स्वरूपाचा असला तरी त्याला समजून घेणे महत्त्वपूर्ण होईल.

रोमन कॅथॉलिक, प्रोटेस्टंट आणि ऑर्थोड्रोक्टास या तीन शाखेबरोबरच अनेक उपपंथ ख्रिस्ती धर्मात आढळून येतात. आज जगात जवळजवळ तीन ते साडेतीन हजार ख्रिस्ती धर्माचे पंथ-उपपंथ आहेत. त्यांचा मुख्य आधार जरी येशू ख्रिस्त आणि पवित्रशास्त्र असला तरी त्यात थोड्याफार प्रमाणात वैचारिक मतभेद आढळून येतात. धर्मसुधारणा चळवळीबरोबरच अनेक शाखा युरोपात उदयास येऊ लागल्या. पवित्रशास्त्र सांगते, सर्व ख्रिस्ती लोकांनी ख्रिस्ताच्या एकच प्याला प्यायलेला आहे आणि त्यात समान विश्वास, समान आत्मा, समान शास्त्रवचने आणि समान तारण आहे. तरी आज पंथीय-अपंथीय हा भेद का ? असा प्रश्न सहज उपस्थित होतो. उत्तर आहे खऱ्या ख्रिस्ती धर्मात पाखंडी पंथांचा आणि सिद्धांतांचा उदय आणि हा उदय इसवी सनाच्या दुसऱ्या शतकातपासूनच सुरु आहे. सुरुवातीला विकलांगत्यांचा एक गट मंडळीत अस्तित्वात आला आणि मग हळूहळू मूर्तीपूजेचे प्राबल्य अथवा शिरकाव झाला. त्यामुळे ख्रिस्ती धर्म आजही हे आव्हान पेलत आहे. सेंट ऑगस्टीन यांनी आपल्या सुधारणावादी विचारांनी पूर्वमध्ययुगीन काळात तर मध्ययुगीन काळात मार्टिन ल्युथर यांनी या खोट्या पंथांचा विरोध केला. पवित्रशास्त्र आणि पवित्रआत्मा हे सामान्य मनुष्याचे मार्गदर्शक असून येशू ख्रिस्त हाच प्रथम आहे, हे त्यांनी दाखवून दिले. त्यामुळे जागतिक धर्मसुधारणेबरोबरच मिशनरी चळवळीचा प्रवाह फोफावला. ख्रिस्ती धर्मात जे पंथ पवित्रशास्त्र आणि ख्रिस्तावर आधारलेले आहे, तेच खरे आहे. पवित्रशास्त्राचे खोटे विवेचन करून लोकांना बहकावीण्यास कारणीभूत ठरणारे पंथ आणि लोक ख्रिस्ती धर्मात घुसल्याकारणाने हे आव्हान ख्रिस्ती धर्माला पेलावे लागत आहे. "खरे ख्रिस्ती जीवन हे आधुनिक ख्रिस्ती जीवनातील भोंगळ मनोरंजनापासून कितीतरी भिन्न आहे. ख्रिस्ती जीवन म्हणजे संघर्ष आहे. नरकाच्या सैन्याविरुद्ध आम्ही एक अखंड युद्ध छळले आहे. युद्धाची सुरुवात झालेली आहे व त्यात आता माघार घेता येणार नाही. हे जो शिपाई समजू शकत नाही, त्याला बेइमानी म्हणावे लागेल."[५] खोट्या पंथांना आणि खोट्या ख्रिस्ती लोकांना वरील वाक्यात बेईमान असे म्हटले आहे आणि आज ख्रिस्ती धर्मात अनेक बेईमान घुसलेले आहेत. त्यापासून सावधान राहणे हे खरे ख्रिस्ती लोकांसाठी मोठे आव्हान आहे. पण ख्रिस्त त्याच्या बलस्थाने असल्याकारणाने ते आव्हान पेलून घेणारे बनतात. "धर्मामध्ये आवेशी असलेला मनुष्य ठळकपणे एकाच गोष्टीचा मनुष्य आहे. तो मनुष्य प्रामाणिक, ओवती, तडजोड न करणारा, उत्तम प्रकारे पूर्ण मनाने काम करणारा आणि आत्म्यामध्ये उत्साही असतो. एवढेच म्हणणे पुरेसे नाही. तो फक्त एकच गोष्ट पाहतो, एकाच गोष्टीची काळजी घेतो, एकाच गोष्टीने त्याला काबीज केलेले असते आणि ती गोष्ट म्हणजे देवाला आनंद देणे."[६] खरा ख्रिस्ती व्यक्ती हा खोट्या धर्म सिद्धांताला बळी न पडता त्याचे आव्हान तो पेलून घेतो. कारण त्याचा अंतिम उद्देश देवाला आनंद देणे होय.

तसेच ख्रिस्ती धर्मापुढील आधुनिक आव्हान म्हणजे पोस्ट रिलिजन. युरोपात धर्म ही संकल्पना बदलत जात आहे. आधुनिक युग हे भौतिक युग असल्याकारणाने सुख आणि भोगाचा अतिरेक होत आहे आणि त्यामुळे अध्यात्मिक तत्वांचा ऱ्हास होत आहे. आधुनिक ख्रिस्ती धर्मातील लोक हे ऐहिकतेकडे झुकत चालले आहे. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड आणि युरोपातील इतर राष्ट्रात ख्रिस्ती धर्माच्या शाखा या औपचारिक पद्धतीने कार्य करीत आहे. त्यांच्यातील आत्मिक सजीवन कोठेतरी हरवून जात आहे. त्यामुळे आधुनिक युगात ख्रिस्ती धर्माला पवित्रशास्त्र आणि ख्रिस्ताचे सत्यस्वरूप टिकवून ठेवण्यासाठी मोठे आव्हान पेलावे लागणार आहे.

"Post Christianity is the loss of the primacy of the Christian worldview in public affairs, especially in the western world here Christianity had previously flourished, in favor of alternative worldviews such as secularism, nationalism, environmentalism and militant theism amongst many other ideologies. It can also include personal world views ideologies, religious movement or societies success veganism or ethical veganism, that at no longer necessarily rooted in the language and assumptions of Christianity at least

explicitly, although the had previously been in an environment of ubiquitous Christianity."[७]

ख्रिस्ती धर्म ख्रिस्ती मिशनरिनी आणि मंडळींचा इतिहासकारांनी काळानुसार सत्यशिक्षणावर टिकवून ठेवलेला आ1हे. चर्च हे स्वर्गाचे प्रतिबिंब असले तरी ते पृथ्वीवर आहे आणि ख्रिस्ती लोक त्या चर्चचे प्रतिनिधित्व करणारे घटक युरोपात मध्ययुगात धर्म आणि राजकारण एकत्र झाल्यामुळे एक हजार वर्षे खऱ्या ख्रिस्ती लोकांवर अन्याय झाला. आधुनिक काळात आता ख्रिस्ती धर्मात भौतिक तत्वांचा शिरकाव झाल्यामुळे खोट्या शिक्षणाचा शिरकाव होत आहे आणि त्यामुळे खरे ख्रिस्ती धर्मातील लोकांना आणि मंडळींना पुन्हा धर्मसुधारणा चळवळीकडे वाटचाल करावी लागणार का ? असा प्रश्न उपस्थित होतो.

ख्रिस्ती धर्माला बाह्य आव्हानांबरोबरच आंतरिक आव्हाने देखील पेलावी लागणार आहे आणि ते तेव्हाच पेलली जाऊ शकतात जेव्हा ख्रिस्ती धर्मातून खोट्या सिद्धांतांचा समूळ नाश होणार आणि हे शक्य आहे. पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन त्यासाठी पुरेसे आहे. पण एक ख्रिस्ती व्यक्ती म्हणून मी हे आव्हान पेलण्यासाठी तयार आहे का.?

## संदर्भसूची:-


1) पूर्वोक्त विश्वासनाऱ्यासाठी पवित्रशास्त्र टीका संग्रह, विल्यम मकडोनाल्ड, पृ.क्र. ३९७.
2) Tertallian (Apology), Pp. 50.
3) पूर्वोक्त, भारत घडो, बाबू के. वर्गीस, पृ.क्र. ४८५.
4) धर्मांतरण, विशाल मंगलवादी, नवनीत प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २००२, पृ.क्र. ११२.
5) पूर्वोक्त, खरे शिष्यत्व, विल्यम मकडोनाल्ड, पृ.क्र. ६७.
6) पूर्वोक्त, ख्रिस्ती शिष्यत्व, विल्यम मकडोनाल्ड, पृ.क्र. ४०.
7) www.postchristianity.wikipedia Date 28/11/2017, Time 13.03 PM